## ती आणि आत्मभान

ती उंबरठ्याचे माप ओलांडून,
आली घरात..
तिला वाटले, प्रत्येकाच्या मनात देखील,
घर करू !
मधुचंद्राचे दिवस थोडे,
बावरलेले..
तिला वाटले, होऊ द्यावी अजून ओळख,
धीर धरू !
नव्याचे नऊ दिवस,
पटकन संपले..
तिला वाटले, माहेरची सय येणारच,
नको झुरू !
स्वप्नं काही होती उराशी,
एक एक करत विझली....
तिला वाटले, हे काय नशिबी?
मागं फिरू ?
आई-बाबांनी शिकवलं खूप,
आठवत सारं राहिली चूप...
तिला वाटले, होईल सगळं नीट,
दमादमाने वाटचाल करू !
अचानक ओच्यात एक चाहूल.
मग सगळ्याचीच कशी पडली भूल...
तिला वाटले, तनामनात भिरभिरणारे,
जणू पाखरू !
'तिचा' जन्म झाला आणि
सभोवार फक्त आनंद..
तिला वाटले, भरून पावले आता,
नवे पर्व सुरु !
आत्तापर्यंत होते हात,

आता पाय पण अडकले..
तिला वाटले, आपण कलंदर,
पुरून उरू !
वेड्या आशा, अश्शा छळतात..
१४ वर्षं फशी पडतात..
तिला वाटले, वनवासच हा..
कुणा स्मरू ?
पण मग आले भान तिला,
स्वतःचे, जगण्याचे....
ती परत एकदा उंबरठ्यापाशी,
आली दारात..
तिला वाटले, हे ओलांडले कि बाहेरचे विश्व -
कसेही तरू,
नवा श्वास भरू,
खूप कष्ट करू,
खरं-खुरं जगून...
मगच मरू...मगच !!!!!

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**